## नि.दि.दा.क.६२/२०१४ मधील नि.३९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनाप्रमाणे, प्रस्तुत दावा प्रलंबित असतांना आणि त्याची माहिती प्रतिवादी क.२२ याला असतांना त्याने वादींच्या अपरोक्ष नुकसान करण्याच्या हेतूने दि.२८/८/२०१३ रोजीच्या बेकायदेशीर कुळमुखत्यारपत्राचा गैरवापर करुन प्रतिवादी क.७ शेवंताबाई धर्मा मसणे ही मयत झाली असतांना नोंदणी कमांक ४५३६/२०१४ खरेदीखत स्वतःच्या लाभात नोंदवून घेतले. ते वादींच्या हक्क हितसंबंधावर बंधनकारक नाही. त्यामुळे त्यासंदर्भात दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करुन मिळावी अशी वादीची मागणी आहे.

३. सदर अर्जाला प्रतिवादी याने निशाणी ४६ वर म्हणणे देवून हरकत घेतलेली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, दावा मिळकतीपैकी ०.३७. ३३ हे.आर. या मिळकतीवर प्रतिवादी क.१ ते १७ यांची मालकी आणि कब्जेवहिवाट आहे. त्याच्याशी वादीचा काहीही हक्क हितसंबंध नाही. दिनांक २८/८/२०१३ रोजीचे नोंदणीकृत साठेखत याची पुर्तता दिनांक १/९/२०१४ रोजी, नोंदणीकृत खरेदीखताने प्रतिवादी क.२२ च्या लाभात करण्यात आलेली आहे. प्रतिवादी याने अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारलेला असून न्यायालयाची दिशाभूल करुन जैसे थे हुकूम मिळावा असे कथन केले आहे. केवळ, दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्यासाठी अर्ज दाखल असल्यामुळे तो खर्चासह फेटाळण्यात यावा अशी त्यांची मागणी आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कथन व परस्परविरोधी युक्तीवाद विचारात घेता पुढील मुददा माझ्या विचाराधीन आहे व त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत मी पुढील प्रमाणे नोंदवित

आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १) वादीची दुरुस्ती मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | ..... होय. |
| २) आदेश काय ? | ...... अंतिम आदेशाप्रमाणे. |

**-: कारणमिंमासा :-**

**मुददा क.१ व २ संदर्भात** :-

५.    दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चे अवलोकन केले असता न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही पक्षकारास त्याच्या वादकथनात न्याय असेल अशारितीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत.

६.    मी अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांतर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. याठिकाणी हे वादातीत नाही की, वादीने मुळ दावा दिनांक ४/४/२०१४ रोजी दाखल केलेला आहे. सदरचा दावा हा दिनांक २८/८/२०१३ रोजीचा साठेकरार आणि कुळमुखत्यारपत्र बेकायदेशीर ठरवून मिळणेकरिता आहे. त्याच दस्तांसंदर्भात दावा प्रलंबित असतांना दिनांक १/९/२०१४ रोजी साठेकरारानुसार नोंदणीकृत खरेदीखत करण्यात आले ही वस्तुस्थिती स्वत: प्रतिवादी त्यांच्या म्हणण्यामध्ये सांगत आहे. याचाच अर्थ, दावा प्रलंबित असतांना जी नवीन परिस्थिती उद्‌भवली त्यासंदर्भात वादी दाव्यात दुरुस्ती करुन अनुषंगिक अनुतोषाची मागणी करत आहे. सदर दुरुस्तीचे स्वरुप विचारात घेता, दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. दाव्याचा अंतिम निर्णय योग्य अयोग्यतेच्या आधारे आणि गुणवत्तेवर होण्याकरिता तसेच, दोन्ही पक्षकारांतील वादातीत प्रश्न योग्य अयोग्यतेचा विचार करुन निर्णित

करण्याकरिता सदरची दुरुस्ती मंजूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी यांची कोणतीही अपरिमित हानी होणार नाही. त्याचा विचार करता वरील मुद्दयाला मी होकारार्थी निष्कर्ष नोंदतो आणि पुढीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## **आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२.वादी यांना अर्जात मागणी केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

३. सदरची दुरुस्ती वादी यांनी पुढील नेमलेल्या तारखेच्या आत करावी.

४. खर्चासंदर्भात आदेश नाही.

(आ.म. सामंत)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत
जिल्हा - रायगड.

कर्जत
दिनांक : २१/०४/२०१६